झाडीपट्टीतील पोळा सणाप्रसंगीच्या झडत्या

डॉ. आर. आर. दिपटे,
एस. एन. मोर महाविद्यालय,
तुमसर, जि. भंडारा
8308107399
rajeshdipte@gmail.com

सारांश :–

लोकसाहित्य हा प्रत्येकच देशातील लोकांचा बहुमूल्य ठेवा असतो. तो लोकजीवनातील आविष्कार असतो. याचा निर्माता अनामिक असतो. गेयता यातील मुख्य घटक असून पूर्व विदर्भातील भंडारा जिल्हयात पोळा हा सण विशेष लोकप्रिय आहे. झाडीपट्टीतील अनेक लोककलेच्या प्रकारापैकी पोळयाच्या सणाच्या वेळी म्हटल्या जाणा–या झडत्या हा विशेष लोकगीत प्रकार आहे. हे लयबद्ध गीत असून महादेव व पार्वती या लोकदेवतांचा यात प्रामुख्याने उल्लेख असतो. या झडत्यामध्ये सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील विषय आढळून येतात. शंकर–पार्वती हे गोपालन करणाऱ्या कृषिव्यवस्थेचे प्रतिक म्हणून झडत्यांमध्ये येतात. काही वेळा व्यक्तिगत श्रेष्ठत्व दाखविण्याच्या कुरघोडीतून झडत्यांची निर्मिती होते. झडत्यांची रूपे काळानुरूप बदलल्याचे दिसते. शेतकऱ्यांची हलाखी, दुष्काळ, पिकांवरील संकट याचा उल्लेख असतो. तर कधी आशावादी जीवनाचे प्रतिक म्हणून हा सण साजरा केला जातो.

बीजशब्द : झाडीपट्टी, लोकगीत, झडती, पोळा सण.

भारतीय समाज अंतर्गतरित्या निरनिराळया संस्कृतींनी समृद्ध झालेला आहे. या समाजात अभिजन आणि सामान्य असे दोन प्रवर्ग प्रत्येक काळात दिसून येतात. या दोन प्रवर्गातील लोकांच्या समजुती, धारणा आणि जीवनशैली या सर्व बाबी भिन्न असतात. मानवी समाज हा कलासक्त व रंजनप्रधान असल्यामुळे प्रत्येक मानवी समूहाच्या कलेच्या अभिव्यक्तीसुद्धा निरनिराळया दिसतात. भारतातील अभिजन वर्गाने अनेक कला विकसित केल्या आहेत. त्याचप्रमाणे भारतातील सामान्य लोकांनीसुद्धा स्वाभाविक गरजेतून अनेक कलांचा विकास केला आहे.

अभिजन वर्गाची शास्त्रशुद्ध कला ही समाजाच्या ठरावीक वर्गापुरती मर्यादित राहते. परंतु तिचा बोलबाला अधिक असतो. कलेची आणि समीक्षेची क्षेत्रे प्रस्थापित वर्गाच्या हातात असल्यामुळे अभिजन वर्गाच्या कलेला प्रतिष्ठासुद्धा मिळते. परंतु अभिजन कला व्यवहाराच्या आड समाजामध्ये एक मोठा वर्ग उत्स्फूर्तपणे कलानिर्मिती करीत असतो. कलेचा आस्वादसुद्धा घेत असतो. त्यातूनच आपल्या सामाजिक, आर्थिक व नैतिक तत्वज्ञानाचा तो आविष्कार करीत असतो. सामान्यपणे लोकांच्या या सामूहिक कलेला 'लोककला' म्हटले जाते. त्यांच्या मौखिक साहित्याला लोकसाहित्य असे म्हटले जाते. 'लोक' हा शब्द सामुहिक जाणिवेचा उद्‌गार आहे. समाजातील एका मोठ्या वर्गाचे या शब्दातून प्रतिबिंब दिसते.

लोक या शब्दाबाबत डॉ. सत्येंद्र म्हणातात की, ''लोक म्हणजे असा जनसमूह की जो अभिजात संस्कार, पांडित्य, कृत्रिमता यांच्यापासून स्वाभाविकपणेच दूर असलेला आणि परंपरेने चालत आलेल्या जीवन प्रवाहात जीवन जगणारा लोकसमूह म्हणजे 'लोक' होय.''[१] लोक या संकल्पनेचे सर्वसामान्यपणे कष्टाचे जीवन जगणाऱ्या, सत्तेची सूत्रे हाती नसलेल्या परंतु बहुसंख्येने जगत असलेल्या लोकांचा बोध होतो. प्रस्तावित अभिरुचीपेक्षा कलेच्या क्षेत्रातील निराळी अभिरुची या वर्गाने विकसित केलेली असते. कोणत्याही पुस्तकी ज्ञानापेक्षा दैनंदिन जीवनातले व्यावहारिक ज्ञान त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. श्रम हे त्यांच्या

आयुष्यातील महत्त्वाचे सूत्र आहे. श्रमाचा परिहार करण्याच्या दृष्टीने सर्व कला निर्माण झाल्या असे सुद्धा अनेक अभ्यासक मानतात. श्रमाच्या कामानंतर अथवा त्याच वेळेदरम्यान अनेक कलांची निर्मिती झाली. जसे नावाडी जेव्हा नाव चालवतो तेव्हा होणाऱ्या त्याच्या आवाजापासून ''वल्लव रे नाखवा'' सारखे ध्वनी निर्माण झाले. स्त्रिया जात्यावरच्या श्रमातून ओव्यांची निर्मिती करू लागल्या. तर शेतकरी उत्पन्नानंतर आनंदोत्सवासाठी गीत म्हणू लागले. भारतातील विविध सण सुद्धा कृषीजीवनाशी व लोकजीवनाशी संबंधित आहेत, सामान्य लोकांच्या जीवनात श्रम या मूल्याला प्रतिष्ठा आणि महत्त्व असते. लोकगीत आणि सामूहिकता यांचे परस्परसंबंध स्पष्ट करतांना के. सी. दास म्हणतात, 'लोकगीत लोकसमूहाच्या जीवनाचे स्वयंरचित अभिव्यक्ती आहे.'[२] लोककला या समाजाच्या मुळ संस्कृतीचा गाभा असतात. लोककला व लोकसाहित्याचे स्वरूप हे बहुतांश वेळा मौखिक असते. आज लोककलांची निर्मिती ज्या काळात लेखन व मुद्रण कलेचा विकास झाला नव्हता तेव्हापासून सुरू आहे. त्यामुळेच तिचा खरा प्रसार आणि प्रचार मौखिक माध्यमातूनच होतो. लोककलेचा अथवा लोकसाहित्याचा कर्ता कुणी एक व्यक्ती नसते. तर तिचा आविष्कार सामूहिकपणे होत असतो. प्रत्यक्षात तिचा कोणी एक कर्ता असला तरी तो कर्ता अनामिक असतो. लोकसाहित्याच्या लहान लहान घटकांमध्ये सामान्य लोक आपल्या परीने भर टाकत असतात. निरनिराळया काळातील त्यांचे आकलन, धारणा व समजुती यांचा प्रभावसुद्धा या बदलांवर होत असतो. लोकसाहित्य हे एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत जाते. या संदर्भात डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात की, 'मौखिक परंपरा, लोकजीवनाचा आविष्कार, भावनात्मकता आणि संक्रमणशीलता ही लक्षणे लोकगीताच्या संदर्भात महत्वाची आहेत.'[३] लोकसाहित्याला संहितेची अथवा पुस्तकांची गरज नसते. ते स्मृतीरूपाने व गेय पद्धतीने एकामेकांकडे हस्तांतरित केले जाते. त्यामुळे लोकसाहित्य हे एका व्यक्तीचे नसते तर ते संपूर्ण लोकसमूहाचे असते.

लोकगीते हा लोकसाहित्याचा एक महत्वाच्या घटक आहे. लोकगीतांमध्ये गेयता हा गुणधर्म असतो. 'लय' हे तिचे प्राणतत्त्व असते. रंजनप्रधानता व उद्‌बोधकता हे तिचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. सर्वसामान्य लोकांच्या समूहातूनच निर्माण झाल्यामुळे त्याच लोकांच्या अभिरुचीची पकड लोकगीतेत नेमकेपणाने घेत असतात. ज्याप्रमाणे नाटक, चित्रपटांना नागर संस्कृतीतील लोक आज महत्त्वाचे साधन समजत आहेत. त्याचप्रमाणे प्राचीन काळापासून लोकगीतांना सामान्य ग्रामीण लोकांनी करमणुकीचे महत्त्वाचे साधन मानले होते. त्यामुळे लोकगीतांना लोकसाहित्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. लोकगीताच्या संदर्भात ना. रा. शेंडे म्हणतात की, 'लोकगीते हा तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. त्या आत्मपिंडातून स्त्रवणारे विविध भाव, निर्झर आणि त्यांची लकाकी मनुष्य मात्राच्या जीवनप्रणालीचे द्योतक ठरतात.'[४] म्हणजेच सर्वसामान्य लोकांची जीवनपद्धती, जगण्याचा दृष्टिकोण, त्यांची अभिरुची, त्यांचे विचार, माणसातील अनेक प्रवृत्ती व सामान्य लोकांची जीवनमूल्ये या सर्वांचे प्रतिबिंब लोकगीतांमधून स्पष्टपणे दिसून येते.

पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्याचा परिसर झाडीपट्टी अथवा झाडीमंडळ या नावाने ओळखला जातो. इथल्या बोलीभाषेला झाडीबोली असे म्हटले जाते. महाराष्ट्रातल्या या चार जिल्ह्यासोबतच छत्तीसगड आणि मध्यप्रदेश येथील काही भाग झाडीबोली बोलणाऱ्या लोकांनी व्यापला आहे. झाडीपट्टीच्या परिसराला प्राचीन काळापासून साहित्य निर्मितीचे अनेक संदर्भ आहेत. विशेषत: महानुभाव संप्रदायातील अनेक ग्रंथ या परिसरात लिहिले गेले. चक्रधराच्या जीवनातील बराच मोठा काळ ते या परिसरात वास्तव्यास राहिले. लीळाचरित्र या महत्त्वाच्या प्राचीन मराठी ग्रंथामध्ये झाडीपट्टीतील अनेक गावांचा, घटनांचा उल्लेख आहे. या झाडीपट्टीला ज्याप्रमाणे संत साहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे.

त्याचप्रमाणे लोकसाहित्याचीसुद्धा एक सकस आणि सर्जनशील परंपरा लाभली आहे. लोकसाहित्याचे हे सर्व भांडार अनेक पिढ्याकडून संक्रमित होत आजच्या काळातसुद्धा समृद्धपणे टिकलेले आहेत. झाडीपट्टीतील लोककलेच्या अनेक प्रकारांपैकी पोळयाच्या सणाच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या 'झडत्या' हा लोकगीतप्रकार विशेष लोकप्रिय आहे. या झडत्यांमध्ये काव्यात्म परिणाम साधून लयबद्ध गीतांची निर्मिती केली जाते. महादेव आणि पार्वती या लोकदेवतांचा यामध्ये प्रामुख्याने उल्लेख असतो. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये दिसणारी विषमता ही बहुस्तरीय व बहुआयामी आहे. ही विषमता लोकांच्या जीवनपद्धती, राहणीमान, आचार विचार, पोशाख अश्या सर्व लहान मोठ्या घटकांना प्रभावित करणारी होती. तसेच लोकांच्या धारणा समजुती यासुद्धा निरनिराळया होत्या. या सामाजिक विषमतेचे प्रतिबिंब निरनिराळया प्रकारच्या देवी देवतांमध्ये सुद्धा दडलेले आहेत. श्रीराम, कृष्ण, गणपती या देवता उच्चभ्रु आणि उच्चवर्णीय लोकांमध्ये प्रचलित आहेत, तर शंकर पार्वती, खंडोबा, म्हसोबा ही दैवते निम्नजातीय व निम्नवर्गीय लोकांमध्ये प्रचलित असल्याचे दिसते. महात्मा फुल्यांनी याबाबत सविस्तर वर्णन त्यांच्या गुलामगिरी या ग्रंथात केले आहे. झाडीपट्टीतील झडती या गीतप्रकारात येणारे शंकर पार्वतीचे वर्णन याच कारणाने येते असे वाटते. झडत्यांमध्ये सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील वेगवेगळे विषय आढळून येतात जसे,

बळी रे बळी लिंब बनी,
अशी कथा सांगेल कोणी ?
राम–लक्ष्मण गेले हो वनी,
राम–लक्ष्मणाने आणली वनफुले,
ते दिले महादेव पारबतीच्या हाती,
तिनशे साठ नंदी,
एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव

या झडत्यामधून देवी–देवतांचे वर्णन व त्यांच्या जीवनातील प्रसंग दिसून येतात. यातूनही महादेव पार्वतीच्या हातात तिनशे साठ नंदी आहेत असा उल्लेख येतो. यातूनच शंकर पार्वती हे गोपालन करणाऱ्या कृषीव्यवस्थेचे प्रतीक म्हणून येतात. बऱ्याचदा कृषीसंस्कृतीतील सामान्य लोकांचे प्रतिनिधी म्हणून सुद्धा शंकर, पार्वतीचे वर्णन येते.

वाटी रे वाटी खोबऱ्याची वाटी,
महादेव रडे दोन पैशासाठी,
पारबतीच्या लुगड्यले छप्पन गाठी,
देव कवा धावला गरिबांसाठी,
एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव

काहीवेळा व्यक्तिगत श्रेष्ठत्व दाखविण्याच्या कुरघोडीतून झडत्यांची निर्मिती होते असेही आढळते.

मेंढी रे मेंढी शेंबडी मेंढी,
ते खाते आला–पाला,
तिचा गुरु माहा चेला,
लाथ मारून सरका केला,

एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव

काही प्रसंगी कृषीजीवनातील पशुप्रेमसुद्धा व्यापक होताना दिसते. यातूनच पोळयाचा उत्साह, बैलाची सजावट यांच्याही प्रत्यय येतो.

ऐल गाडा पैल गडा,
बैल गेला डोहह....., पौनगाडा,
पौनगाडाची आणली माती.....
त्याचा घडवील नंदी,
अन ठेवला तोरणामंदी,
घाट आणला धूप आणला,
झाला पोळाचा साज.....
अखेरची झडती देता,
पोळा सरल्याचा झाला आवाज.....
एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव

काही वेळा नेत्यांनी किंवा लोकसमूहाने लोकांमध्ये आंदोलन करण्याकरिता उत्साह पेटविण्याकरिता झडत्यांची रूपे वापरल्याचे दिसते.

पोळा रे पोळा,
पाऊस झाला भोळा,
शेतकरी हितासाठी,
सगळे व्हा गोळा,
हर बोला हर हर महादेव

तर काहीवेळा शेतकऱ्यांच्या हलाखीचे वर्णन झडत्यामधून होते त्या हलाखीचा सामना सुद्धा करतांना सामान्यजण दिसून येतात. जसे,

आम्ही करतो पऱ्हाटीची शेती,
प–हाटीवर पडली बोंड अळी,
नागोबुडा म्हणते बुडाली शेती,
पोरगा म्हणते लाव मातीले छाती,
एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव

या झडतीमध्ये बोंड अळीचे संकट पिकावरी आलेले आहे. शेती बुडाली असे लोकं म्हणतात, परंतु तरीही पोरगा आपल्या बापाला छातीला माती लाव आणि शेतीसाठी तयार हो असे सांगतो.

माझ्या पायाला रुतला काटा,
झालो मी रिकामा,
नाही पिकल यंदा,
तर जीव माहा टांगणीला,

एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव

अशा काही झडत्यामधून शेतकऱ्यांची दुरावस्था, आर्थिक शोषण व हलाखीचे दर्शन होते. शेतकऱ्याचा जीव हा नेहमीच टांगणीला लागून राहतो. अशी स्थिती झडत्यांमधून व्यक्त होते. काहीवेळा झडत्यामधून एकमेकांची गंमत, जंमत, विनोदसुद्धा केले जातात.

आभाळ गडगडे शिंग फडफडे,
शिंगात पडले डोहहह खडे,
''बाई'' न केले बेसनाचे वडे,
''राव'' जाऊ जाऊ पडे,
एक नमन गौरा पारबती,
हर बोला, हर हर महादेव
वाडी रे वाडी मिरच्याची वाडी,
मी घेतली नवीन बैलगाडी,
गाडीला घेतली नवी बैलजोडी,
दोघे मिळून करू सगळयांची खोडी,
हर बोला, हर हर महादेव
दस्ती रे दस्ती हिरवी पिवळी दस्ती,
कोणाच्या अंगात आली रे मस्ती,
त्यांनी लावा, म्या गावठी दोस्ता संग कुस्ती,
हर बोला, हर हर महादेव

थोडक्यात वरील वर्णनावरून असे लक्षात येते की, झडती हा झाडीपट्टीतील लोकजीवनाचा अविभाज्य घटक आहे. सामान्य लोकं तिची निर्मिती करीत असल्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या भावना, धारणा, समजुती, परिस्थिती आणि अपेक्षा या सर्वांचे प्रतिबिंब झडत्यांमधून दिसून येते. सर्वसामान्य लोक हे कथेला महत्व देतात. त्यांच्या गरजा किमान असतात. परंतु त्याही भागविणे त्यांना दुरापास्त होते. या सर्व हलाखीचे वर्णन झडत्यांमधून दिसून येते. शिवाय या सर्व झडत्या झाडीबोलीत असल्याने ती प्रत्यक्ष ऐकण्याची अस्सल मजा वेगळीच असते. झडत्या या झाडीपट्टीतील लोकजीवनाचा आरसा आहे. आपल्या मनातील सुप्त भाव, भावना, इच्छा, आकांक्षा व्यक्त करण्यासाठी झाडीपट्टीतील लोकांनी वापरलेले हे प्रभावी लोक माध्यम आहे.

(या लेखातील झडत्यांची संकलन भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील बपेरा, आंबागड, पवनारखारी, पांजरा या गावांमधून केले आहे.)

निष्कर्ष :–

१. सामान्य ग्रामीण परिसरात राहणाऱ्या लोकांनी या लोककला व लोकगीतांची निर्मिती केली आहे.
२. या झडत्यांमधून शेतकरी वर्ग, त्यांचे जीवन, त्यांच्या भावना, वेदना, उत्साह, देवतंना आव्हान या सर्वांचे वर्णन यातून दिसून येते.
३. गेयता हा लोकगीतातील प्रमुख घटक असतो.

४. भंडारा जिल्हयात हा सण मोठया आनंदाने साजरा केला जातो. प्रत्येक गावात या झडत्या मोठया प्रमाणात ऐकायला मिळतात.

५. या विविध झडत्यांमधून पोळयाचा सण, बैलाची सजावट आंदोलने याचा उल्लेख आहे. कर्जबाजारीपणा, दुष्काळ, पिकांवरील रोग, अस्मानी, सुल्तानी संकट असूनही मोठया उमेदीने जगणारा हा शेतकरी झडत्यांमधून दिसून येतो.

संदर्भ सूची :–

१. डॉ. शरद व्यवहारे, ''लोकसंस्कृतीचा अंतप्रवाह'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १५ जून १९९९, पृ. ९

२. डॉ. शरद व्यवहारे, ''मराठी लोकगीत : स्वरूप विशेष'', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९०, पृ. ३५

३. तत्रैव, पृ. १

४. तत्रैव, पृ. १